गाव तिथे प्रतिनिधी
नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १०२ वा ● मंगळवार २९ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 102 | Date : 29/08/2023 | blow : Tuesday | Page 4 | Price 4

# राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांचे वितरण

## ऑलिम्पिकमध्ये यश मिळावे यासाठी खेळाडूंना सर्व सहकार्य;पुरस्कार रकमेत वाढ : मुख्यमंत्री

पुणे/प्रतिनिधीः भारत २०३६ चे यजमानपद भूषविण्याच्यादृष्टीने पूर्वतयारी करत असून राज्यानेही प्रत्येक क्रीडा प्रकारातील आपली बलस्थाने आणि कमकुवत दुवे ओळखून या ऑलिम्पिक स्पर्धेच्या पूर्वतयारीचा 'रोडमॅप' तयार करावा, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी केले. शिवछत्रपती क्रीडा संकुल (बॅडमिंटन हॉल), महाळुंगे, बालेवाडी येथे आयोजित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, ग्राम विकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार श्रीरंग बारणे, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, क्रीडा व युवक सेवा आयुक्त डॉ. सुहास दिवसे आदी उपस्थित होते.



राज्यपाल श्री.बैस म्हणाले, ऑलिम्पिक स्पर्धेच्या माध्यमातून आपल्या खेळाडूंना घरच्या प्रेक्षकांसमोर चांगली कामगिरी करण्याची संधी मिळेल. क्रीडातज्ज्ञ आणि खेळाडूंच्या सहकार्याने आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी योजना तयारी करण्यात यावी. शालेय स्तरावरील विविध स्पर्धांच्या आयोजनात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यावरही भर द्यावा लागेल.

ऑलिम्पिकमध्ये यश मिळावे यासाठी खेळाडूंना सर्व सहकार्य : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, महाराष्ट्र खेळाला प्रोत्साहन देणारे देशतील अग्रेसर राज्य आहे. त्यामुळे खेळात महाराष्ट्राने घवघवीत यश मिळवले आहे. चौथ्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत ५६ सुवर्ण पदकांसह एकूण १६१ पदके मिळवून तसेच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ३९ पदकांसह १४० पदके मिळवून अव्वल कामगिरी केली. राष्ट्रकुल स्पर्धेतही आपल्या खेळाडूंनी यश मिळवले. ऑलिम्पिकमध्येही चांगले यश मिळावे यासाठी सर्व सहकार्य करू. खेळाडूंनी राज्याचा लौकीक आंतरराष्ट्रीय पातळीवर असाच उंचवावा, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.

**१५ जानेवारी आता राज्य क्रीडा दिन** मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी ऑलिम्पिक पदक विजेते कुस्तीपटू स्व.खाशाबा जाधव यांचा जन्मदिन १५ जानेवारी हा दिवस महाराष्ट्राचा राज्य क्रीडा दिन म्हणून घोषित केला.

**पुरस्कारांच्या रक्कमेत वाढ; आजच्या पुरस्कारार्थ्यांनाही लाभ** क्रीडा क्षेत्रात योगदान देणाऱ्यांचा नितांत आदर राज्य सरकारला आहे. त्यांच्या कार्यातून इतर खेळाडूंना प्रेरणा मिळेल, असे सांगून खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार विजेत्या खेळाडूंना पाच लाख रुपये आणि अन्य पुरस्कार विजेत्यांना तीन लाख रुपये देण्याची घोषणा यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली. आज दिलेल्या पुरस्कार विजेत्यांनाही वाढीव पुरस्कार रक्कम देण्यात येईल, असेही त्यांनी घोषित केले.

क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यात राज्य शासन अग्रेसर-अजित पवार

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन अग्रेसर आहे. क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूला छत्रपती शिवाजी महाराजाच्या नावाने पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी देण्यात आलेल्या पुरस्काराच्या । **पान २ वर**

### पुढच्या वर्षीच्या दहावी-बारावीच्या परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर

## बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी तर दहावीची १ मार्च रोजी होणार



मुंबई : पुढील वर्षी होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आलं असून दहावीची परीक्षा ही १ मार्च रोजी होणार आहे तर बारावीची २१ फेब्रुवारी रोजी होणार आहे. बोर्डाने हे जाहीर केलेलं www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर २८ ऑगस्ट पासून उपलब्ध करून देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण बोर्डाने पुढील वर्षी होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या संभाव्य परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केलं आहे. त्यामध्ये बारावी बोर्ड परीक्षा ही २१ फेब्रुवारी ते २३ मार्च २०२४ पर्यंत होणार आहे. तर दहावी बोर्ड परीक्षा ही १ मार्च ते २२ मार्च २०२४ पर्यंत होणार आहे.

शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने, विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी-मार्च २०२४ च्या लेखी परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील संभाव्य वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा आणि उच्च माध्यमिक शाळा तसेच । **पान २ वर**

## सिईओ मनिषा आव्हाळे यांनी केला नेत्रदानाचा संकल्प!

### राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा, बालकांनी पथनाट्यातून सांगितले नेत्रदानाचे महत्व




सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हा परिषेदेच्या प्रशासक व सिईओ मनिषा आव्हाळे यांनी मरणोत्तर नेत्रदानाचा स्वतः संकल्प करून सर्व अधिकारी व कर्मचारी यांना नेत्रदानाचे आवाहन केले. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात जिल्हा अंधत्वनियंत्रण समितीने राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन व ज्ञान प्रबोधिनी शालेय विद्यार्थ्यांमार्फत नेत्रदान जनजागृती संदर्भात पथनाट्य सादरीकरण करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे या होत्या. प्रारंभी धन्वंतरी चे पुजन सिईओ आव्हाळे यांचे हस्ते करणेत आले. दीपप्रज्वलन केलेनंतर नेत्रदानाची शपथ देणेत आली.


या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, जिल्हा शल्यचिकित्सक । **पान २ वर**

## फक्त भारताकडेच चंद्राचा सर्वात जवळचा फोटो

भारत : भारत आता चंद्रावर पोहोचला आहे. २३ ऑगस्ट हा दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. याच दरम्यान इस्रो प्रमुख एस सोमनाथ यांनी भारताकडे चंद्राचे सर्वोत्तम फोटो असल्याचं म्हटलं आहे. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, केरळमधील तिरुवनंतपुरममधील एका कार्यक्रमामध्ये माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली आहे. यावेळी त्यांनी म्हटलं की, आपल्याकडे चंद्राचा सर्वात जवळचा फोटो आहे आणि तो जगात कोणाकडेही नाही. इतका जवळचा फोटो कोणाजवळच नाही. या सर्वांना हा फोटा मिळवण्यासाठी इस्रोच्या कॉम्प्युटर सेंटर आणि इंडियन स्पेसक्राफ्ट एक्सप्लोरेशन मिशन डेटा सेंटरशी संपर्क साधावा लागणार आहे.

विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हरसंदर्भात माहिती देताना त्यांनी म्हटलं की, लँडर आणि रोव्हर दोघेही त्यांचं काम व्यवस्थित करत आहेत. चांद्रयान -३ । **पान २ वर**

## येत्या काळात जिओच्या माध्यमातून सर्वांना कृत्रिम बुद्धीमत्ता सेवा देणार; मुकेश अंबानींची क्रांतिकारी घोषणा




मुंबई: रिलायन्स उद्योग समूह आता भारतात कृत्रिम बुद्धीमत्ता म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या विकासाचं मॉडेल विकसित करणार असल्याची घोषणा मुकेश अंबानी यांनी केली. त्या माध्यमातून भारतातील प्रत्येक नागरिकाला, कोणत्याही ठिकाणी आणि कधीही AI चा वापर करता येऊ शकेल असं कंपनीचं ध्येय असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. रिलायन्सच्या ४६ व्या एजीएमला संबोधित करताना त्यांनी ही महत्वपूर्ण घोषणा केली. रिलायन्सच्या जिओ प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून कृत्रिम बुद्धमत्ता तंत्रज्ञानाचा विकास करण्यात येणार असून त्याचा सर्व नागरिक, व्यवसायिक आणि सरकारला लाभ होणार आहे. हे मॉडेल विकसित करणे हे जिओसाठी सर्वाधिक रोमांचकारी असेल असं मुकेश अंबानी म्हणाले. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा शाश्वत पद्धती आणि हरित भविष्याचा अवलंब करताना, क्लाउड आणि एज अशा दोन्ही ठिकाणी २,००० मेगावॅट एआय-रेडी कम्युटर कॅपॅबिलिटी निर्माण करण्याची कंपनीची वचनबद्धता असल्याचं मुकेश अंबानी यांनी स्पष्ट केलं.

जागतिक स्तरावर आर्टिफिशियल इंटेलिजन्सची क्रांती उदयास येत आहे. त्याचा परिणाम हा जगभरातल्या अर्थव्यवस्था, उद्योग तसेच नागरिकांच्या । **पान २ वर**

## चंद्रानंतर आता भारताची सूर्याला गवसणी;

### मिशन आदित्य एल१ चा मुहूर्त ठरला



श्रीहरीकोटा : चंद्रावर चांद्रयान-३ चे यशस्वी लँडिंग करून इतिहास रचणाऱ्या इस्रोने आता एका नव्या मैलाच्या दगडाकडे पाऊल टाकले आहे. ISRO ने जाहीर केले आहे की ते २ सप्टेंबर रोजी आदित्य-L1 मिशन लाँच करेल. श्रीहरिकोटा येथून सकाळी ११.५० वाजता प्रक्षेपित होईल. लॉन्चिंग पाहण्यासाठी सर्वसामान्य नागरिकही नोंदणी करू शकतात. गॅलरीत बसून प्रक्षेपण पाहण्यासाठी इस्रोने आपल्या वेबसाइटवर नोंदणी लिंक देखील । **पान २ वर**

# राज्यात हातभट्टी मुक्त गाव अभियान लवकरच राबविणार : ना.शंभूराज देसाई

**✻अवैद्य मद्य निर्मिती व विक्री तसेच बाहेर राज्यातील मद्य विक्री विरोधी मोहीम अत्यंत प्रभावीपणे राबवावी ✻महसूल वाढीसाठी देण्यात आलेले उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण झाले पाहिजे यासाठी नियोजन करावे**

सोलापूर/प्रतिनिधी : राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने राज्यात मागील तीन-चार महिन्यापासून हातभट्टी विरोधी मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेमुळे इतर मद्याच्या विक्रीत चांगली वाढ झालेली आहे. तरी राज्यात हातभट्टी मुक्त गाव अभियान राबविण्याबाबत शासन स्तरावरून लवकरच धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार असून या अभियानात सहभागी होणाऱ्या गावांना प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित पुणे विभागातील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आढावा बैठकीत श्री देसाई मार्गदर्शन करत होते. यावेळी उत्पादन शुल्क पुणे विभागाचे उपायुक्त मोहन वर्दे, राज्य उत्पादन शुल्क चे अधीक्षक चरणजीत राजपूत (पुणे), प्रमोद सोनोने(नगर), नितीन धार्मिक (सोलापूर) यांच्यासह विभागातील उप अधीक्षक ही उपस्थित होते.राज्य उत्पादन शुल्क मंत्री श्री. देसाई पुढे म्हणाले की. पुणे विभागातील उत्पादन शुल्क विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांनी विभागातील सर्व गावांमध्ये हातभट्टी निर्मिती नष्ट करण्यासाठी काटेकोरपणे कारवाई करावी. शासन लवकरच हातभट्टी मुक्त गाव अभियान धोरण आणणार असून त्या अनुषंगाने एकाही गावात हातभट्टीची निर्मिती होणार नाही याची दक्षता घ्यावी. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी गावातील सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांचा सक्रिय सहभाग घेण्यात यावा असे निर्देश त्यांनी दिले.




पुणे विभागाला व त्यातील प्रत्येक जिल्ह्याला विभागाच्या वतीने महसूल वाढीचे जे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे ते उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण झाले पाहिजे याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपल्या जिल्ह्यात कोठेही अवैद्य मद्य निर्मिती व विक्री होणार नाही. तसेच बाहेरील राज्यातील मद्य अवैद्यपणे येथे येणार नाही व आपल्या जिल्ह्यातून इतर राज्यात अशा पद्धतीने मद्य विक्रीसाठी जाणार नाही याबाबत उत्पादन शुल्क विभागाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी, नियुक्त केलेल्या भरारी पथकांनी व चेक पोस्ट वरील पथकांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश मंत्री श्री. देसाई यांनी दिले.

उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांना दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सोयी सुविधा विभागाच्या वतीने देण्यात येतील. वाहन व इतर अद्यावत सर्व सोयी सुविधांची मागणी विहित पद्धतीने विभागाकडे त्वरित करावी. त्याप्रमाणेच आवश्यक असलेले मनुष्यबळ भरती प्रक्रिया सुरू असून पुढील सहा महिन्यात राज्यात सर्वत्र विभागाला मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार । **पान २ वर**

## इंडिया आघाडीच्या चिन्हाचं ३१ ऑगस्टला अनावरण होणार

मुंबई : लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधीपक्षांच्या इंडिया आघाडीची तिसरी बैठक ही मुंबईत होणार आहे. या बैठकीमध्ये इंडियाच्या चिन्हाचं देखील अनावरण होणार आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटलं आहे की, ३१ ऑगस्ट रोजी संध्याकाळी इंडियाच्या चिन्हाचे अनावरण करण्यात येणार आहे. यावर बोलताना त्यांनी म्हटलं की, इंडिया आघाडीचं चिन्ह हे सर्वांसाठी प्रेरणादायी असणार आहे. तसेच या चिन्हाचं ३१ ऑगस्टला सायंकाळी सात वाजता ग्रँड हयातला अनावरण होणार आहे. त्यामुळे आता आमच्यावर घाव घालणं किंवा आरोप करणं सगळ्यांनाच महागात पडणार आहे.

विरोधी पक्षांची मुंबईत जी बैठक पार पडणार त्याचं आयोजन शिवसेना (ठाकरे गट) कडून करण्यात येणार आहे. । **पान २ वर**

## ✻ सुविचार ✻

मनात ध्येयाची ऊर्मी असेल तर पायात धावण्याची गती येते.

## संपादकीय

### भारतीयांचा विश्वास...

भारतालाच नव्हे, तर जगाला ज्याची प्रतीक्षा होती, ते चांद्रयान-३ मोहिमेने साध्य केले. बुधवारी सायंकाळी ६ वाजून ४ मिनिटांनी विक्रम लँडर चंद्राच्या पृष्ठभूमीवर उतरले आणि इस्रोने अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने नवा इतिहास घडवला. इस्रोच्या शास्त्रज्ञांच्या कष्टाचे हे यश आहे, त्याचे विस्मरण कोणालाही होणार नाही, हे निश्चित! भूतलावर जल्लोष झाला. देशभरात तर अक्षरश: दिवाळी साजरी झाली. प्रत्येक कानाकोपऱ्यात तिरंगा डौलाने फडकत होता. तमाम भारतीयांची मान अभिमानाने उंचावली. इस्रोच्या मुकुटात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. कामगिरी फत्ते करून चंद्राचा दक्षिण ध्रुव पादाक्रांत करणारा भारत हा पहिला देश बनला आहे. २०१३-१४ मध्ये मंगळावर यशस्वीपणे यान उतरवणारा भारत पहिलाच देश ठरला. अमेरिकेची नासा, रशिया आणि युरोपियन स्पेस एजन्सीसारख्या दिग्गज देशांना पहिल्याच प्रयत्नात मंगळ ग्रहाच्या कक्षेत कृत्रिम उपग्रह पोहोचवता आला नव्हता, तो पराक्रम भारताने केला होता. या लौकिकाला साजेशी पुढील मोहीम इस्रोने आखली. चंद्र मोहीम इस्रोसाठी कठीण नव्हती, पण त्यातही अवघड आव्हान इस्रोने स्वीकारले. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यान उतरविण्याची योजना इस्रोने हाती घेतली. २०१९ मध्ये अगदी हाता-तोंडाशी आलेली पहिली मोहीम अयशस्वी ठरल्यानंतर त्यातून धडा घेत इस्रोने चांद्रयान-३ मोहीम हाती घेतली आणि यशस्वी करून दाखविली. आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून 'चांद्रयान३'चे १४ जुलै रोजी दुपारी यशस्वीरीत्या अवकाशात प्रक्षेपण झाले. त्यानंतर यशस्वीपणे मार्गक्रमण करत या यानाने महत्त्वाचे सर्व टप्पे पार केले. अखेर चंद्राच्या पृष्ठभूमीवर सॉफ्ट लँडिंग केल्याने इस्रोच्या या कामगिरीची सुवर्ण अक्षरात नोंद झाली. तिथल्या वातावरणाशी मिळती-जुळती ठरतील अशी उपकरणे तयार करणे, तिथल्या परिसरात फिरू शकेल असे रोव्हर तयार करणे हे आव्हान इस्रोने पेलले आहे. हेच खरे इस्रोच्या शास्त्रज्ञांचे कौशल्य आहे आणि या कौशल्याचे कौतुक तर व्हायलाच पाहिजे. आता तेथील वातावरण, वायू, खनिजे यांचे अस्तित्व यासह अनेक गोष्टींचा अभ्यास या मोहिमेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. आता लक्ष आहे, ते इस्रोच्या नव्या मोहिमेकडे. भारत आता नव्या गगनयान अंतराळ मोहिमेसाठी सज्ज झाला असून गगनयान मिशनच्या सर्व्हिस मॉड्युल प्रोपल्शन सिस्टीमची अलीकडेच यशस्वी चाचणी घेण्यात आली. इस्रोचा धडाका बघता ही मोहीमदेखील नक्कीच यशस्वी होईल..

# राज्यात फुटबॉल विकासासाठी जर्मनीतील 'बुंदेसलिगा'सोबत महत्वाचा सामंजस्य करार




पुणे : राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन आणि जर्मनी येथील 'बुंदेसलिगा' या सर्वात मोठ्या व्यावसायिक फुटबॉल लीगमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. महाराष्ट्राच्यावतीने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंह देओल आणि क्रीडा व युवक सेवा आयुक्त सुहास दिवसे, तर बुंदेसलिगाचे प्रतिनिधी श्रीमती ज्युलीया फार, पीटर लीबल, कौशिक मौलिक यांच्यात कराराचे आदानप्रदान करण्यात आले.

या कराराबाबत समाधान व्यक्त करताना राज्यपाल श्री.बैस म्हणाले, राज्यातील अनेक जिल्ह्यात फुटबॉल लोकप्रिय आहे. राज्यात फुटबॉलसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचे अधिक प्रयत्न होण्याची गरज आहे. त्यादृष्टीने या कराराद्वारे राज्याने घेतलेल्या पुढाकाराचे राज्यपालांनी स्वागत केले.बुंदेसलिगा ही जर्मनीची प्रमुख व्यावसायिक फुटबॉल लीग आहे.

रोमांचक फुटबॉल स्पर्धांचा अनुभव आणि समृद्ध इतिहासासाठी लीग प्रसिद्ध आहे. ही युरोपमधील अग्रणी फुटबॉल लीगपैकी असून फुटबॉलमधील सर्वोत्तम खेळाडू आणि संघ लीगशी संबंधित आहेत. १९६३ ची स्थापना असलेल्या बुंदेसलिगा लीगमध्ये प्रत्येक हंगामात १८ क्लब प्रतिष्ठित विजेतेपदासाठी झुंजतात. बुंदेसलिगा ही रोमहर्षक सामन्यांच्या शिवाय फुटबॉल प्रतिभेला जोपासण्यात आणि खेळाच्या विकासाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. जागतिक स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करणारे कुशल खेळाडू घडविण्याचे कार्यही लीग करते. महाराष्ट्राशी झालेल्या करारामुळे राज्यांतर्गत फुटबॉलच्या विकासासाठी लीगकडील कौशल्य आणि संसाधनांचा लाभ होणार आहे. या भागीदारीमुळे महाराष्ट्र क्रीडा विकास आणि यशाच्या एका नव्या पर्वाचा साक्षीदार होणार आहे. १४ वर्षाखालील वयोगटातील स्पर्धा, प्रशिक्षण, क्रीडा विज्ञान केंद्र आदी क्षेत्रात यामुळे सहकार्य होणार आहे.

## जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांसाठी माहिती अधिकार कार्यशाळेचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधी: जिल्हयातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांच्या उपक्रमा विषयीची अचूक माहिती योग्य वेळी व प्रभावीपणे प्रसारित केली जाण्यास चालना मिळावी व माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत अभिप्रेत असलेल्या अधिकारांचा वापर कसा करावयाचा याबाबतचे प्रबोधन तसेच कायदेशीर व तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय आणि राष्ट्रीय प्रशिक्षण प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ रोजी समाज कल्याण केंद्र, रंगभवन, सोलापूर येथे करण्यात आले आहे.

तरी जिल्हयातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रतिनिधी यांनी कार्यशाळेस उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले आहे.या कार्यशाळेत माहिती अधिकार कायद्याची पार्श्वभूमी आणि आंतरराष्ट्रीय इतिहास कायद्याची उद्दिष्टे, माहिती अधिकार कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी, कलम एक ते ३१ मधील सविस्तर माहिती, कलम चार मधील महत्त्वाच्या तरतुदी, अर्ज, अपील, शास्ती व नुकसान भरपाई यांची सविस्तर माहिती सदर कार्यशाळेत देण्यात येणार आहे. आयोजित कार्यशाळेस मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा पुणे) चे राज्य प्रशिक्षक शिवाजीराव पवार, माहिती अधिकार कायद्याचे सुप्रसिध्द लेखक बापूराव बनसोडे, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, ग्रंथमित्र कुंडलीक मोरे तर अध्यक्ष म्हणून सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र विजयकुमार पवार उपस्थित राहणार आहेत.

## प्रमाणित व अधिकृत वजन काट्यांचाच वापर करावा

सोलापूर/प्रतिनिधी : वैधमापनशास्त्र अधिनियम २००९ मधील तरतूदीनूसार पडताळणी व मुद्रांकन न झालेले व सोबत मूळ पडताळणी प्रमाणपत्र नसलेले इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरणे हे अप्रमाणित असून त्यांचा वापर करणे हा बेकायदेशीर आहे. सर्व उपयोगकर्ते, व्यापारी, कारखानदार जे वजन काटयांचा उपयोग आपल्या व्यवहारात करतात त्यांनी प्रमाणित असलेल्या व अधिकृत वजन काट्यांचाच वापर करावा असे आवाहन वैधमापनशास्त्र कार्यालयाव्दारे करण्यात येत आहे.अलिकडच्या कालावधीत चीन या देशातून आयात केलेली अप्रमाणित वजन काट्यांची विक्री काही स्थानिक विक्रेत्यांकडून करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. अशा प्रकारची आयात केलेली इलेक्ट्रॉनिक काटे वैधमापनशास्त्र अधिनियम अंतर्गत असलेल्या नियमानुसार पडताळणी केलेली नसते. त्यामुळे त्यांचा वापर करणे बेकायदेशीर आहे. अशा प्रकारच्या काट्यांची विक्री कोणत्याही अधिकृत परवानाधारक व्यक्ती किंवा बेकायदेशीरपणे विक्री करणा-या व्यक्तीनी करु नये, बेकायदेशीर विक्री करणा-या व्यक्ती किंवा त्यांचा वापर करणा-यांवर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद कायदयात आहे.बेकायदेशीर तोलन उपकरणे वैधमापनशास्त्र विभागांच्या कार्यालयाव्दारे जप्त केली जातात. व वापरण्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते. तसेच शेजारील राज्यातील वजन काटे यांची विक्री केली जाते. अशी तोलन उपकरणे ही कायदयातील तरतूदीनुसार पडताळणी केलेली व ज्यासोबत मूळ प्रमाणपत्र मूळ विक्री बिल असल्यास ती वापरणे कायदेशीर आहे. अन्यथा अशी वजन काटे विक्रेते व उपयोगकर्ते यांचेवर सुध्दा दंडात्मक कारवाई होऊ शकते. परराज्यातून सुटया भागांची मागणी करून काही अनधिकृत व्यक्ती या काटयांची निर्मिती करतात. व त्यावर आपले स्टिकर लावून विक्री करतात. अशी कृती सुध्दा बेकायदेशीर असून,त्यांच्यावर सुध्दा दंडात्मका कारवाई होऊ शकते. त्यामुळे अप्रमाणित वजने काटे मूळ प्रमाणपत्र व मूळ बिल नसलेली, सिल नसलेली काटे, अनधिकृत उत्पादकांनी उत्पादीत केलेली काटे यांचा वापर उपयोगकर्त्यांनी त्वरीत थांबवावा अन्यथा त्यांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल. शिवाय अशी वजन काटे जप्त केली जातील, अनधिकृत विक्रेते व अनधिकृत उत्पादकानी सुध्दा याची दखल घ्यावी. असे आवाहनही वैद्यमापनशास्त्राचे उपनियंत्रक यांनी केले आहे.

पान १ वरुन

### राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते ..

रकमेत १ लाख रूपयाऐवजी ३ लाख आणि ३ लाख रूपयाऐवजी ५ लाख रुपये अशी वाढ करण्यासाठी लागणाऱ्या २ कोटी ३८ लाख रुपयांच्या रकमेस मान्यता देण्यात येईल. हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिवस 'राष्ट्रीय क्रीडा दिन' म्हणून साजरा केला जातो. स्व.खाशाबा जाधव यांच्या जन्म दिवस १५ जानेवारी 'राज्य क्रीडा दिवस' म्हणून साजरा करण्याबाबत विचार व्हावा, असे त्यांनी सांगितले.

भालाफेकमध्ये गेल्या वर्षी रौप्यपदक आणि यावर्षी जागतिक थलेटिक्स स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणाऱ्या आंतरराष्ट्रीय भालाफेकपटू नीरज चोप्रा यांचे आणि पुरस्कारार्थींचे अभिनंदन करून श्री.पवार म्हणाले, खेळाडूंना घडविण्यात त्यांचे कुटुंबीय, प्रशिक्षकाचे फार मोठे योगदान आहेत. भविष्यात अशीच अनेक पदके मिळाविण्याचा खेळाडूंनी प्रयत्न करावा. शासनाकडून नेहमीच क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतली जाईल.

**युवा खेळाडूंनी पुरस्कार विजेत्यांचा आदर्श घ्यावा-गिरीश महाजन**

ग्रामविकास मंत्री श्री. महाजन म्हणाले, खेळाडूंच्या मागणीचा विचार करुन त्यांना आवश्यक क्रीडा सुविधा आणि स्पर्धांना जाण्यासाठी विमान प्रवासाची सुविधा देण्याचा निर्णय घेण्यात आला. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळामध्ये पदक जिंकणाऱ्या खेळाडूंच्या देण्यात येणाऱ्या बक्षिसाच्या रकमेत वाढ केली, अनेक निर्णय राज्य शासनाने घेतले. यापुढेही खेळाडूंना लागणाऱ्या आवश्यक त्या सोई-सुविधा क्रीडा विभागाच्यावतीने देण्यात येईल. आपले खेळाडू विविध क्रीडा स्पर्धात राज्याचे नाव उज्वल करीत आहेत. नवीन खेळाडूंनी यामधून स्फुर्ती घेऊन आपल्या खेळात उत्तम कामगिरी करावी, असेही महाजन म्हणाले.

क्रीडा क्षेत्रातील गुणवत्ता वाढीसाठी मिशन 'मिशन लक्ष्यवेध'-संजय बनसोडे

क्रीडा मंत्री श्री.बनसोडे म्हणाले, राज्यात क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी शासनातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. खेळाडूंना नवीन तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा आणि गुणवत्ता वाढीसाठी 'मिशन लक्षवेध' योजनेंतर्गत स्पोर्ट्स सायन्स सेंटर लवकरच सुरु करण्यात येणार आहे. क्रीडा विद्यापीठासाठीदेखील कुलगुरुंची लवकरच नियुक्ती करण्यात येणार आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा, ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या स्पर्धकांना आणि त्यांच्या मार्गदर्शकांना देण्यात येणाऱ्या बक्षिसांच्या रक्कमेत भरघोस वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पारंपरिक क्रीडा प्रकारांना चालना देण्यासाठी प्रो- कबड्डी

लीग स्पर्धेच्या धर्तीवर यावर्षी मुंबईत प्रो- गोविंदा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यासाठी ५० हजार गोविंदांचा विमा उतरविण्यात आला असून विम्याच्या रकमेमधे वाढ करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकात श्री.दिवसे यांनी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांविषयी माहिती दिली. बुंदेसलिगा या जागतिक क्रीडा संघटनेसोबत करार करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यपाल महोदयांच्या हस्ते महाराष्ट्र शासनाच्यावतीने सन २०१९-२०, सन २०२०- २१ व सन २०२१-२२ या वर्षासाठी देण्यात येणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, खेळाडू पुरस्कार, एकलव्य खेळाडू पुरस्कार (दिव्यांग खेळाडू), साहसी क्रीडा पुरस्कार व जिजामाता पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. एकूण ११९ खेळाडू आणि प्रशिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. श्रीकांत शरदचंद्र वाड यांना सन २०१९-२० या वर्षाचा तर दिलीप बळवंत वेंगसरकर यांना सन २०२०-२१ या वर्षाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी तर

कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल असं महाराष्ट्र बोर्डाने जाहीर केलं आहे. त्या अंतिम छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी असं आवाहनही करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असे राज्य मंडळाकडून सांगण्यात आले आहे.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल. या संभाव्य वेळापत्रकांबाबत काही सूचना, हरकती असल्यास त्या विभागीय मंडळाकडे तसेच राज्य मंडळाकडे १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पाठवाव्यात. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या सूचनांवर विचार केला जाणार नाही, असंसुद्धा बोर्डाकडून सांगण्यात आले आहे.

### सिईओ मनिषा आव्हाळे यांनी

डॉ. धनंजय पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, नेत्रतज्ञ गणेश इंदुरकर, डॉ.श्रीकांत कुलकर्णी, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता खराडे, कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड प्रमुख उपस्थित होते.

सिईओ मनिषा आव्हाळे यांचे सह अधिकारी व कर्मचारी यांनी केला नेत्रदानाचा संकल्प केला.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील यांचे हस्ते सिईओ यांना मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केलेबद्दल सन्मानपत्र देणेत आले. त्यानंतर सिईओ मनिषा आव्हाळे यांचे हस्ते उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, अधिक्षक अनिल जगताप, सहाय्यक लेखाधिकारी कटकधोंड, जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात यांना नेत्रदान संकल्प पत्र वितरीत करणेत आले. त्यानंतर नेत्रदान केलेले नातेवाईक लक्ष्मीनारायण गुर्रम, प्रकाश विधानी, शरद ढाले यांचे मातोश्री यांचा गौरव करणेत आला.

सिईओ आव्हाळे यांनी केला नेत्रदानाचा संकल्प!

जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नेत्रदान चळवळीत सहभाग घेऊन नेत्रदान करावे. असे आवाहन सिईओ मनिषा आव्हाळे यांनी करत स्वत मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला. स्वर्ग व नरक कोणाला माहित आहे. याच डोळ्यांनी जग पहा.या सभागृहामध्ये आपण जी शपथ घेतो त्या शपथेचा जीवनात अंगीकार करा. असे आवाहन उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील यांनी केले तर सुत्रसंचालन डॉ. विलास सरवदे यांनी केले. आभार विकास लिंगराज यांनी आभार मानले.

बालकांनी पथनाट्यातून सांगितले नेत्रदानाचे महत्व.!

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात राष्ट्रीय नेत्रदान पंधरवाड्याचे उदघाटन झाले नंतर ज्ञानप्रबोधिनी बालविकास मंदिर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे सादरीकरण केले. अंध विद्यार्थीनीस नेत्रदानामुळे केस जग पहायला मिळाले! याचे उभेउभ चलचित्र पथनाट्यातून मुला-मुलींनी सादर केले. हातात नेत्रदानाचे फलक घेऊन विद्यार्थ्यांनी नेत्रदाना साठी उपस्थितांना आवाहन केले.

देवा .. माझे नशिबी असा अंधपणा का दिला?

पथनाट्यात एका मुलींने अंधमुलीची भुमिका अतिशय चपखलपणे सादर केली. नेत्ररोपण केलेनंतर त्या मुलीच्या बोलक्या भावना हृदयास स्पर्श करणे सारखे होत्या. डॉक्टर काका मला आता मला सर्व काही दिसतय! असे सांगून मुलीने सर्वांचे अंगावर रोमांच उभे केले.ज्ञानप्रबोधिनी च्या गायत्री मोरे, भार्गवी सुतार, निहारिका हुच्चे, मृणाल देशमुख, अनघा पुजारी, आर्या गवळी, किरण भुसेकर, शर्वरी काटे, भार्गवी कुलकर्णी, आराध्या शंकू, अभया वानकर, समृध्दी होनमुटे, सर्वेश देशपांडे, शर्विल नागणे, श्रेयस सलगर, आदर्श आकुडे, प्रथमेश पवार, सुदर्शन रामपुरे, सुवर्णनील गलंडे, विनय कुलकर्णी, आयुष कांबळे, कणक शंकु, स्वरा स्वामी, शिक्षिका रत्नमाला जोशी, रजनी भदे, लेखक व निर्देशक राजु मोहोळकर यांनी या साठी परिश्रम घेतले.

### फक्त भारताकडेच चंद्राचा..

मधील प्रज्ञान रोव्हर आणि विक्रम लँडर हे सुस्थितीत आहेत आणि त्यांच्यामध्ये लावण्यात आलेली पाचही उपकरणं ही व्यवस्थित काम करत आहेत. तसेच येत्या दहा दिवसांमध्ये सर्व प्रयोग यशस्वी करण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. रोव्हरच्या देखील वेगवेगळ्या चाचण्या करायच्या आहेत. कारण रोव्हर हे चंद्रावरील खनिजांचे परीक्षण करणार आहे. गगनयान मिशनवरही इस्रो प्रमुखांनी महत्त्वपूर्ण भाष्य केलं आहे. यावर बोलताना त्यांनी म्हटलं आहे की, गगनयान मिशनसाठी आमची तीच टीम काम करत आहे. आमच्याकडे गगनयान, चांद्रयान किंवा आदित्यसाठी वेगवेगळ्या टीम नाहीत. आमच्याकडे त्याच टीम आहेत, त्या अत्याधुनिक पद्धतीने काम करणार आहेत. चांद्रयान ज्या विश्वासाने आम्ही पूर्ण केलं त्याच विश्वासाने आम्ही गगनयान देखील यशस्वी करु.

### राज्यात हातभट्टी मुक्त गाव अभियान

आहे. त्यामुळे विभागातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत चोखपणे आपली जबाबदारी पार पाडावी, अशा सूचना मंत्री श्री. देसाई यांनी केल्या.

प्रारंभी पुणे विभागाचे उपायुक्त श्री. वर्दे यांनी विभागातील पुणे, अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यात उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती पीपीटीद्वारे बैठकीत सादर केली.पुणे विभागाच्या महसुलात मागील वर्षीपेक्षा यावर्षी १३ टक्के वाढ झालेली आहे, त्याप्रमाणेच गुन्हे अन्वेषणाचे प्रमाणात १५ टक्के वाढ झालेली आहे. तसेच हातभट्टी दारू विरुद्ध दिनांक १ एप्रिल २०२३ ते २७ ऑगस्ट २०२३ पर्यंत २००४ गुन्हे नोंदवण्यात आलेले आहेत. यामध्ये पुणे जिल्ह्यात ९७५, अहमदनगर ४०७ सोलापूर ५११ व विभागीय भरारी पथक १११ अशी गुन्ह्यांची संख्या असून महसूल जमा करण्याचे पुणे विभागाला दिलेले उद्दिष्ट शंभर टक्के पूर्ण होईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### चंद्रानंतर आता भारताची

जाहीर केली आहे. इस्रोने सूर्याचा अभ्यास करण्यासाठी ही पहिली भारतीय अंतराळ मोहीम असेल.

या मिशनमध्ये हवामानाची गतीशीलता, सूर्याचे तापमान, अतिनील किरणांचा पृथ्वीवर होणारा परिणाम आणि ओझोन थर यांचा अभ्यास केला जाणार आहे. सूर्याचा अभ्यास करून हवामानाचा अंदाजही अधिक अचूक होईल, असा शास्त्रज्ञांचा विश्वास आहे. यामुळे अशी यंत्रणा तयार होण्यास मदत होईल, ज्याद्वारे वादळाची माहिती तात्काळ मिळेल आणि त्याची सुचना देता येईल. सोलार अल्ट्राव्हायोलेट इमेजिंग टेलिस्कोप, आदित्य L1 मोहिमेसाठी एक प्रमुख साधन, पुणे स्थित इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स (IUCAA) ने विकसित केले आहे

### इंडिया आघाडीच्या चिन्हाचं

याआधी राऊत म्हणाले होते की, मुंबईत होणाऱ्या बैठकीचं आयोजन उद्धव ठाकरे करणार आहेत. तसेच या बैठकीमध्ये इंडियाच्या चिन्हाचं देखील अनावरण होणार असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. यावर बोलताना त्यांनी म्हटलं की, या चिन्हामध्ये इंडियाची खास झलक सर्वांना पाहायला मिळणार आहे. या चिन्हामध्ये सर्वांना बांधून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी आहेत. याशिवाय पूर्वेकडील काही राज्यांमधील पक्ष देखील या आघाडीमध्ये समाविष्ट होण्याची शक्यता आहे.

### येत्या काळात जिओच्या माध्यमातून

रोजच्या जीवनावर अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात होणार आहे. त्यामुळे येत्या काळात जगाशी स्पर्धा करायची असेल तर भारतानेही आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यमातून विकास, इनोव्हेशन आणि समृद्धता वाढवण्यावर भर दिला पाहिजे असं रिलायन्सचे प्रमुख मुकेश अंबानी यांनी स्पष्ट केलं. मुकेश अंबानी म्हणाले की, सर्वांना आणि सर्व ठिकाणी ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी पोहोचवली जाईल असं वचन मी सात वर्षांपूर्वी देशातल्या नागरिकांना दिलं होतं. आज जिओच्या माध्यमातून मी वचन देतो की येत्या काळात सर्वांना आणि सर्व ठिकाणी AI चा लाभ घेता येईल अशी सेवा जिओ विकसित करणार आहे. आपल्या देशात बुद्धीमत्तेची कमतरता नाही असं मुकेश अंबानी म्हणाले. ते म्हणाले की, येत्या काळात AI च्या विकासासाठी आपल्याला डिजिटल पायाभूत सुविधांची गरज मोठ्या प्रमाणात लागणार आहे. या क्षेत्राचा जसजसा विकास होईल तसतसे आम्ही क्लाऊड आणि एज लोकेशन्सच्या क्षमतेमध्ये २००० मेगावॅटपर्यंत वाढ करू. येत्या पाच वर्षात रिलायन्सच्या बहुतांशी कंपन्यांमध्ये हरित उर्जेचा वापर करण्यास प्राधान्य देऊ. त्यामुळे केवळ शाश्वत विकास साधला जाणार नाही तर त्यामुळे उत्पादन खर्चही अत्यंत कमी होणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत गणेशोत्सव नियोजन बैठकीचे आयोजन

# उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ स्पर्धेत अधिकाधिक मंडळांनी सहभाग घ्यावा : उपमुख्यमंत्री




पुणे/प्रतिनिधीः राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडून उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. अधिकाधिक मंडळांनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. उपमुख्यमंत्री श्री.पवार आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालयात गणेशोत्सव नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. बैठकीस आमदार माधुरी मिसाळ, विभागीय आयुक्त सौरभ राव, पोलीस आयुक्त रितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, गणेशोत्सव साजरा करताना वाहतुकीला अडथळा येणार नाही याची गणेश मंडळांनी दक्षता घ्यावी. मेट्रो प्रशासनाने उत्सव काळात मेट्रो सेवा रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवण्याबाबत विचार करावा. गणेश मूर्तीच्या उंचीवर शासनाने कोणतीही मर्यादा घातलेली नाही, मात्र गणेश मूर्ती विसर्जन करताना प्रदूषण होणार नाही आणि उत्सवाचे पावित्र्य जपले जाईल याची दक्षता घ्यावी. गणेश मूर्ती संकलनात जनतेच्या भावनांना धक्का लागणार नाही याकडेही लक्ष द्यावे. धनकवडी भागातील मंडळांनी एकत्रितरित्या विसर्जन मिरवणूक काढण्याचा सुरू केलेला उपक्रम अनुकरणीय असून इतरही मंडळांनी तसा प्रयत्न करावा. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने रस्त्यावरील उघडे चेंबर्स बंद करण्याची कारवाई त्वरित करावी. मिरवणूक मार्गावरील रस्त्यातील खड्डे बुजविण्याचे कामही उत्सवापूर्वी करण्यात यावे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी काही भागातील मार्गावर असलेली एकतर्फी वाहतूक शक्य असल्यास दुतर्फा सुरू करण्यात यावी. मानाच्या गणपतींसोबत इतरही मंडळांसोबतही खेळीमेळीचे वातावरण ठेवत त्यांच्या समस्या प्रशासनाने दूर कराव्यात. पुण्यातील गणेशोत्सव हा राज्याचा उत्सव समजून सर्वांनी यात सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केले.

पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले, गणेश मंडळांकडून महानगरपालिकेने कमानीसाठी कोणताही कर आकारू नये. महापालिका प्रशासनाने गणेश मंडळांशी समन्वय साधून त्यांच्या समस्या दूर कराव्यात. प्रशासनाने नियंत्रण मनोरे स्थापित करून त्या माध्यमातून नियोजनावर लक्ष ठेवावे. पोलीस मित्रांना प्रशिक्षित करून त्यांची मदत घेण्याचा प्रयत्न करावा.गणेश मंडळाने स्वतः नियमावली तयार करून प्रशासनाला सहकार्य करावे. तसेच सर्वांनी मिळून उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.पोलीस आयुक्त रितेश कुमार म्हणाले, गणेशोत्सवासाठी वाहतूक नियमन, पार्किंग व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे याबाबत योग्य ते नियोजन करण्यात येत आहे. गणेशोत्सवासाठी व्हाट्सअँप ग्रुप तयार करण्यात येणार आहे. गणेशोत्सवासाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार असून कुठलाही अनुचित प्रकार होणार नाही यासाठी काळजी घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. श्री.चौबे यांनी पिंपरी चिंचवड शहरात करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली.

आयुक्त विक्रमकुमार यांनी गणेश मंडळांना ५ वर्षासाठी परवानगी देण्यात आल्याचे सांगितले. उत्सवादरम्यान वाहनतळासाठी अतिरिक्त व्यवस्था करण्यात येईल, असेही ते म्हणाले.यावर्षीच्या गणेशोत्सवासाठी जिल्हा प्रशासनाने २३, २४, २६, २७ आणि २८ सप्टेंबर रोजी ध्वनिक्षेपक, वापरासाठी रात्री १२ वाजेपर्यंत शिथिलता देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.सहपोलिस आयुक्त रामनाथ पोकळे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले. मागील वर्षी ३ हजार ५६६ गणेश मंडळांची नोंदणी झाली होती. यावर्षीही तेवढ्याच प्रमाणात गणेश मंडळाद्वारे गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. बैठकीला विविध गणेश मंडळांचे प्रतिनिधी, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**अशी आहे गणेशोत्सव स्पर्धा** सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची पुरस्कारासाठी निवड दहा निकषांच्या आधारे करण्यात येईल. १० निकषांसाठी एकूण १५० गुणांक आहेत. पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूकर सजावट, ध्वनीप्रदुषणविरहीत वातावरण, समाजप्रबोधनात्मक सजावट/देखावा, स्वातंत्र्याच्या चळवळीसंदर्भात, छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षानिमित्त सजावट/देखावा, मंडळामार्फत करण्यात येणारे सामाजिक कार्य, शैक्षणिक, आरोग्य आदीसंबंधी कार्य, पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धांचे आयोजन, पारंपरिक, देशी खेळांच्या स्पर्धा, गणेश भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या प्राथमिक सुविधा आदी निकषानुसार गुण देण्यात येणार आहेत. अर्जाचा नमुना पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या ारहीींरीं.श्रिवरसारळश्र.लो या ईमेलवर ५ सप्टेंबरपर्यंत अर्ज ऑनलाईन सादर करणे अपेक्षित आहे. ८ सप्टेंबरपूर्वी अकादमीमार्फत जिल्हानिहाय अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयास उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

पुणे जिल्ह्यातून ३ गणेशोत्सव मंडळाची निवड व शिफारस समितीमार्फत राज्य शासनाकडे करण्यात येईल. राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची निवड करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय पहिल्या क्रमांकास ५ लाख रुपये, द्वितीय क्रमांकास २ लाख ५० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झालेल्या तीन मंडळांशिवाय अन्य गणेशोत्सव मंडळांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येईल.

## ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संभाजी शिंदेसह इतर आरोपींच्या अटकेची मागणी

### ‘विठ्ठल’च्या माजी संचालकाचा आमरण उपोषणाचा इशारा



पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील गणेश दत्तात्रय ताड या तरुणास डॉ.विजय गवळी यांच्या गुरांच्या शेडवर नेवून डॉ.विजय गवळी,संभाजी शिंदे,तेजस गवळी,अर्जुन गवळी,शुभम गायकवाड यांनी कोयत्याने,तसेच काठी व केबलने बेदम मारहाण केल्याची फिर्याद पंढरपुर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.सदर प्रकरणातील मुख्य आरोपी डॉ.विजय गवळी,संभाजी शिंदे,पोलीस पाटील अर्जुन गवळी याना पोलिसांनी अजूनही अटक केली नाही.सदर घटनेतील आरोपी विरोधात कलम ३०७ नुसार गुन्हा दाखल व्हावा व सदर आरोपीना तात्काळ अटक करण्यात यावी या मागणीसाठी आपण दिनांक १ सप्टेंबर पासून पंढरपूर तहसील कार्यालयासमोर कुटूंबासह आमरण उपोषण सुरु करणार असल्याचा इशारा आज विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक व सदर फिर्यादी गणेश ताड याचे आजोबा नामदेव ताड यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना नामदेव ताड म्हणाले कि,संभाजी शिंदे यांची गावात मोठी दहशत असून त्यांच्या दहशतीमुळेच काहींनी भाळवणी बंद मध्ये सहभाग घेतला मात्र गावातील दारूच्या धंद्यास विरोध केल्याचा राग मनात धरून मारहाण केल्याचा आरोप ताड यांनी केला आहे.संभाजी शिंदे हे ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष असल्याने राजकीय दबाव आणून केस मिटविण्याच्या हालचाली सुरु आहेत मात्र आम्ही या विरोधात कुटूंबासह आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे.

## निफाड नगरपंचायत नगराध्यक्षपदी सौ.शारदा कापसे



निफाड /प्रतिनिधी : निफाड नगर पंचायत च्या नगराध्यक्षा पदी सौ शारदा नंदू कापसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. नगरपंचायत नगराध्यक्षा सौ रत्नमाला संपतरावं कापसे यांनी दिलेल्या मुदतीत आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त पदासाठी तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी शरद घोरपडे यांचे अध्यक्षतेखाली व मुख्याधिकारी अमोल चौधरी यांचे उपस्थितीत नगरपंचायत सभागृहात नगरसेवकांची सभा घेण्यात आली होती .तत्पूर्वी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत नगराध्यक्ष पदासाठी शारदा नंदू कापसे यांनी अर्ज दाखल करून त्यावर सूचक म्हणून .उपनगराध्यक्ष अनिल रंगनाथ कुंदे ...यांनी तर अनुमोदक म्हणून शरद शिवाजी ढेपले यांनी सही केली होती .नगराध्यक्ष पदासाठी सौ शारदा कापसे यांचाच एकमेव अर्ज दाखल झाल्याने काल सोमवारी त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा करण्यात आली . या निवडीनंतर त्यांचा विविध स्वस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी शिवसेना शिंदे गटाचे सह सम्पर्क प्रमूख राजेन्द्र सोनवणे यांनी दूरध्वनी द्वारे नगराध्यक्षा सौ शारदा कापसे यांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे नगर सेवक सागर कुंदे . संदीप जेउघाले.साहेबराव बेर्डे शरद ढेपल, संदीप शिंदे,कांताबाई कर्डिले, रत्नमाला कापसे, डॉ.कविता धारराव, सुलोचना होळकर, विमल जाधव, अरूधती पवार अलका निकम स्वीकृत नगरसेवक संदीप शिंदे .आदी नगरसेवक उपस्थित होते.

यानंतर नगर पंचायत आवारात माजी नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार यांचे अध्यक्षतेखाली आयोजित सत्कार समारंभप्रसंगी व्यासपीठावर लासलगाव बाजार समिती संचालक .राजेंद्र डोखळे, माजी संचालक शिवाजीराजे ढेपले, अर्बन बँक माजी चेअरमन नंदलाल चोरडिया राष्ट्रवादीचे प्रांतीक सदस्य हरिश्चंद्र भवर, प्रमोद जडे, नंदलाल बाफणा, शशांक सोनी, माजी नगरसेविका पल्लवी जंगम, शेतकरी संघाचे माजी संचालक संपत डुंबरे, रामदास व्यवहारे, महेश जंगम, आसिफ पठाण भाऊसाहेब कापसे, शिवाजी धारराव, रमेश जाधव, अंबादास कापसे, देवदत्त कापसे, नंदु कापसे, सुहास सुरळीकर उपस्थित होते यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून कापसे कुटुंबियांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करीत नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ शारदा कापसे यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सुभाष कर्डीले, रामदास वाढवणे.तन्वीर राजे आरिफ मणियार. सुनिल भुतडा, दिपक गाजरे, सुभाष कुंदे, मोहन जाधव, रावसाहेब माळोदे, शाम गोळे, निलेश शिंदे, संपत व्यवहारे, रफीक शेख, बबन सानप, गौतम ललवाणी, शरद वाघ, सचिन जाधव, संतोष सोनवणे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले तर नगरसेवक सागर कुंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले

## व्यावसायिकांनी व्यापक समाज हितासाठी कार्य करावे : राज्यपाल रमेश बैस

मुंबई : जैन तेरापंथ समाजातील व्यावसायिकांनी आपल्या समाजातील युवकांच्या उन्नतीसाठी स्थापन केलेले आयएएस स्पर्धा प्रशिक्षण वर्ग तसेच इतर उपक्रमांचा लाभ सर्वच समाजांमधील युवकांना करुन द्यावा असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले. व्यापक समाज हितासाठी कार्य केल्यास ते ‘लघुतेकडून प्रभुतेकडे’ नेणारे मोठे पाऊल ठरेल, असे प्रतिपादन राज्यपालांनी यावेळी केले. जैन तेरापंथ समाजातील व्यावसायिकांच्या ‘तेरापंथ प्रोफेशनल फोरम’ या संस्थेतर्फे ‘लघुतेकडून प्रभुतेकडे’ या विषयावरील दोन दिवसांच्या १६ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन राज्यपाल बैस यांच्या मुख्य उपस्थितीत नंदनवन परिसर, ठाणे येथे झाले, त्यावेळी ते बोलत होते.

उदघाटनाला जैन तेरापंथ समाजाचे अध्यात्मिक प्रमुख आचार्य महाश्रमण, साध्वी प्रमुखा विश्रुत विभा, मुनी महावीर कुमार, तेरापंथ प्रोफेशनल फोरमचे राष्ट्रीय अध्यक्ष पंकज ओस्तवाल, विश्वस्त चंद्रेश बाफना, रायपूरचे माजी महापौर गजराज पगारिया, मदन तातेड तसेच फोरमचे सदस्य व भाविक उपस्थित होते.

पशुपक्ष्यांना संकटात सापडलेल्या आपल्या इतर बांधवांना फारशी मदत करता येत नाही. मात्र, संकटात सापडलेल्या आपल्या बांधवांना तसेच मूक प्राण्यांना मदत करण्याची क्षमता ईश्वराने केवळ मनुष्याला दिली आहे असे सांगून यशस्वी व्यावसायिकांनी आपली शक्ती व क्षमतेचा वापर करून, ग्रामीण, आदिवासी भागातील गरीब, दिव्यांग, अनाथ लोकांना तसेच कैदी बांधवांना मदत करावी असे राज्यपालांनी सांगितले.भगवान महावीरांच्या अध्यात्मिक शिकवणीला अनुसरुन जैन आचार्य तुलसी यांनी अणुव्रत आंदोलन सुरु केले व त्या माध्यमातून महिलांचे शोषण, हुंडा प्रथा, अस्पृश्यता इत्यादी सामाजिक कुप्रथांविरुद्ध आवाज उठवला याचे स्मरण राज्यपालांनी दिले. व्यसनमुक्तीसाठी त्यांनी मोठे अभियान सुरु करुन हजारो लोकांना व्यसनांपासून सोडवले. त्यांच्या शिकवणीप्रमाणे प्रत्येक व्यक्तीने छोटे-छोटे संकल्प करुन आत्मविकास, समाज विकास व राष्ट्र विकासाच्या कार्यात योगदान द्यावे, असे राज्यपालांनी सांगितले.अहिंसा यात्रे’च्या माध्यमातून व्यसनमुक्ती, नैतिकता व सद्भावना निर्माण करण्याच्या आचार्य महाश्रमण यांच्या कार्याचा राज्यपालांनीगौरव केला.

## अधिकार नसताना दिली वेतनवाढ, शासनाची फसवणूक करणाऱ्या मुख्याध्यापिकेची चौकशी करण्याची मागणी

कळंब/ प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील सौंदना (आंबे) येथील संत गोरोबा काका विद्यालय शाळेचा गैरप्रकार उघडकीस, वेतन वाढ ही सचिवाच्या व शिक्षणाधिकाऱ्यांच्या सहीने होते परंतु या शाळेवर अध्यक्ष व मुख्याध्यापकांच्या संगन मताने वेतन वाढ करण्यात आली असून यामध्ये शासनाची मोठी फसवणूक करण्यात आली आहे.

सविस्तर बातमी अशी की गोकुळ शिक्षण प्रसारक मंडळ रायगव्हाण संचलित श्री संत गोरोबा काका विद्यालय सौंदना आंबे, या संस्थेच्या अध्यक्षाला वेतन वाढ द्यायचा अधिकार नसताना त्यांनी मुख्याध्यापक व अध्यक्ष यांच्या संगणकाने ही वेतन वाढ करून शासनाची फार मोठी फसवणूक केली असून ही संस्थेच्या घटनेच्या विरोधात असून , या शाळेच्या मुख्याध्यापिका १९९८ पासून काम करतात त्यांनी मुख्याध्यापिका होत असताना गोकुळ शिक्षण संस्थेच्या दोन शाळा चालविल्या जातात श्री संत गोरोबा काका विद्यालय सौंदाना आंबे आणि श्री शरदचंद्रजी पवार विद्यालय खोंदला या

दोन्हीही शाळेमध्ये सीनियर कर्मचारी असताना सुद्धा त्यांनी अध्यक्ष माधवराव एडके यांना हाताशी धरून मुख्याध्यापक पद बेकायदेशीरपणे मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हापासून त्या शाळेची खोटी नाटी कामे करत असतात.

२०१७ ला विश्वनाथ नरवडे यांना सचिव पदावरून काढण्यासाठी खोटे कागदपत्र तयार करून धर्मादाय उपयुक्त कार्यालय उस्मानाबाद चेंज रिपोर्ट दाखल केला आहे. त्या जागा मालकाला इमारत भाडे दिले नाही आणि जागा मोकळी करून मूळ मालकांना देत नाहीत. तसेच त्यांनी बीओआय शाखा कळंब येथील बँक खात्यातील खाते क्रमांक-०६४५१०११०००४३३० सचिवाच्या सहीचा नमुना, खोटे पेपर दाखल करून मुख्याध्यापिका सुनीता नरवडे यांनी सचिवाची खोटी सही करून फसवले आहे. त्या नंतर सचिव डॉ. विश्वनाथ नरवडे यांनी अध्यक्ष माधवराव एडके व सुनीता नरवडे यांच्यावर कळंब कोर्टात खटला चालू आहे. आणि यांना मदत करणारे क्लार्क अनंत पाडे यांचे सहकार्य आहे. मुख्याध्यापिका सुनीता नरवडे यांचा विषय इंग्रजी असताना सुद्धा त्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिकवीत नाहीत,

शाळेतील ऑडिट रिपोर्ट संस्थेला मिळत नाहीत. त्यामुळे संस्थेचे ऑडिट करता येत नाही.

त्या शाळेच्या समितीच्या प्रोसिडिंग वर माधवराव एडके यांच्या सह्या घेऊन अनेक खोटे काम करतात. माधवराव एडके यांना कोणतेही आर्थिक प्रशासकीय कामे करण्याचा अधिकार घटने मध्ये नाही, घटनेप्रमाणे हा अधिकार सचिव विश्वनाथ नरवडे यांना आहे.

सुनिता नरवडे ,अनंत पाडे, मच्छिंद्र नरवडे, हे नियमित शाळेत न येता पगार उचलतात मध्यंतरी वरील लोकांची तक्रार माननीय शिक्षण अधिकारी उस्मानाबाद यांच्याकडे केली असता त्यांनी कळंब येथील गटशिक्षणाधिकारी काळमाते यांना चौकशीसाठी शाळेत पाठविले असता चौकशीला जाण्या अगोदरच सुनिता नरवडे यांना माहिती दिली आणि शाळेत जाऊन गोपनीय चौकशी न करता ऑफिसमध्ये बोलावून वरील तिघे सुद्धा शाळेत नियमित हजर आहेत असे लिहून दिले. बाकीच्या कर्मचाऱ्याकडून लिहून आणून खोटा अहवाल शिक्षण अधिकाऱ्यांना सादर केला.अशी माहिती शाळेचे सचिव डॉ. विश्वनाथ नरवडे यांनी दिली.

## मा.आमदार विनय कोरे सावकार यांच्याकडून डी.बी.निर्मळे यांचा सत्कार

कोल्हापूर/नामदेव निर्मळेः सांगली जिल्हातील सागाव गावाला लाभलेले देवदूत. ज्यांनी गेल्या ३८ वर्षांमध्ये शेकडो रुग्णांना जीवनदान दिले व हजारो रुग्णांना अल्प



खर्चामध्ये व अनेकदा स्वतःच्या खिशातील प्रवासाला पैसे देऊन आदर्श आरोग्य सेवा दिली. डॉ.विनायक वझे यांचे नंतर कोण असा प्रश्न ज्यावेळी सागाव पंचक्रोशीला पटला पडला त्यावेळी परमेश्वरानेच ज्यांना आपल्या मूळ गाव टाकळीवाडी तालुका शिरोळ जिल्हा कोल्हापूर येथून धाडलं ते या गावचे सुपुत्र डॉ.डी. बी. निर्मळे यांचा सत्कार डॉ. विनयरावजी कोरे यांच्या हस्ते करण्यात आला.यांचा जन्म दिनांक १ जून १९६१ रोजी झाला. शिक्षण एम.बी.बी.एस सन १९८४ मध्ये पूर्ण झाले.सागाव प्राथमिक आरोग्य केंद्रात सन १९८५ मध्ये रुजू झाले. सन २०२२ मध्ये सेवानिवृत्त झाले. १९९७ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून राज्यपाल यांच्या हस्ते आदर्श वैद्यकीय अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. सन १९९५ मध्ये जिल्हा परिषद आदर्श वैद्यकीय अधिकारी पुरस्कार मिळाला होता. कोरोना काळात कोणत्याही टेस्ट शिवाय तात्काळ निदान करणारे व कोणत्याही विशेष उपकरणाशिवाय २४ तास जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र राबणारे १००% लसीकरणात सिंहाचा वाटा असणारे आरोग्य देवदूत डॉक्टर डी.बी. निर्मळे यांचा सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायतीला विशेष अभिमान वाटत आहे. टाकळीवाडी गावात त्यांचे कौतुक होत आहे.



## मातोश्री म्हेत्रे प्रशालेचे खो खो स्पर्धेत प्रथम..

दुधनी/निंगप्पा निंबाळः तालुकास्तरीय पावसाळी दुधनी येथील मातोश्री लक्ष्मीबाई सा.म्हेत्रे प्रशाला व श्री गुरुशांतलिगेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील १७ वयोगटातील मुली खो खो सामन्यात विजय संपादन करून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तसेच वैयक्तिक खेळात १९ वयोगटातील १०० मी. रनिंग स्पर्धेत मल्लिकार्जुन गायकवाड प्रथम, २०० मी. व ४०० मी. रनिंग स्पर्धेत वीरभद्र कलबुर्गी प्रथम, ४ह्ण १०० रिले स्पर्धेत मल्लिकार्जुन गायकवाड, भीमाशंकर इंगळे,वीरभद्र कलबुर्गी,कार्तिक बसवनकेरी, उदय निंबाळ, दर्शन गायकवाड प्रथम क्रमांक पटकावून संस्थेचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल या सर्व यशस्वी खेळाडूना श्री.म.नि.प्र.डॉ. शांतलिंग महा स्वामीजी ,संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.शंकर म्हेत्रे, उपाध्यक्षा सौ.वैशाली म्हेत्रे ,सचिव प्रथमेश म्हेत्रे अभिनंदन केले.याप्रसंगी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सांस्कृतिक कार्य विभागाच्या पुरस्कारांच्या रकमेत दुपटीने वाढ
## सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा निर्णय
### विविध पुरस्कारांच्या निवड समित्यांची बैठक

मुंबई : सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांच्या रकमेत दुपटीने वाढ करण्याचा निर्णय आज सांस्कृतिक कार्य मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी जाहिर केला. विविध सांस्कृतिक पुरस्कारांच्या निवड समित्यांची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, तेव्हा त्यांनी ही घोषणा केली.

सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या विविध जीवन गौरव पुरस्कारांच्या रकमेत दुपटीने, तर राज्य सांस्कृतिक कार्य पुरस्कारांच्या रकमेत तिपटीने वाढ करण्यात आली आहे. बैठकीला सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, संचालक विभीषण चौरे, समिती सदस्य प्रशांत दामले, अशोक पत्की, पं. ब्रिजनारायण, भरत बलवल्ली, माधव खाडीलकर, अरविंद पिळगावकर, रघुवीर खेडकर, श्रीमती राजश्री शिर्के, आदींसह पुरस्कार निवड समितीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, संगिता चार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार, तसेच १२ वेगवेगळ्या कला प्रकारात देण्यात येणाऱ्या राज्य सांस्कृतिक पुरस्कार निवड समितीच्या बैठका झाल्या. बैठकीत पुरस्कारांसाठी प्राप्त शिफारशी मधून संभाव्य नावांवर चर्चा करण्यात आली.

जीवनगौरव पुरस्कारांच्या रकमेत वाढ करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना देत सांस्कृतिक कार्यमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार या पुरस्कारांची रक्कम पाच लक्ष रुपयावरून दहा लक्ष रुपये तर राज्य सांस्कृतिक पुरस्काराची रक्कम दोन लक्ष रुपयांवरून तीन लक्ष रुपये करण्यात आली आहे.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने २५ ते ५० वर्ष वयोगटातील कलावंतांना युवा पुरस्कार सुरू करण्याचे निर्देशही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिले. निवड समिती सदस्यांमध्ये ऑनलाईन पद्धतीने सत्यशील देशपांडे, उल्हास काशलकर, प्रभा अत्रे, डॉ अजय पोहनकर, अश्विनी भिडे – देशपांडे, पं.उस्मान खान, श्रीमती प्रज्ञा देशपांडे, मंजुषा पाटील सुमित राघवन, डॉ. मृदुला दाढे – जोशी, बाळू धुटे , सत्यपाल महाराज, विजयराज बोधनकर, जयराज साळगावकर आदी उपस्थित होते. बैठकीला अशासकीय सदस्य, शासकीय सदस्य उपस्थित होते.

## बुद्धांचा विचार मानवाच्या कल्याणासाठी आहे : ॲड.प्रज्ञेश सोनावणे

ठाणे/मिलिंद जाधवः दिनांक २६ ऑगस्ट २०२३ रोजी चेंबूर येथील नागेवाडी, पी. एल लोखंडे मार्ग, ज्ञानयोगी बुद्ध विहार समितीच्या वतीने वर्षावासाच्या निमित्ताने, प्रबोधन करण्यास ठाण्यातील ॲड . प्रज्ञेश चैतन्य सोनावणे यांना पाचारण करण्यात आले होते.बुद्ध धम्म संघ, प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक, बावीस प्रतिज्ञा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ इत्यादी विषयांवर छोटे छोटे उदाहरण देऊन उपस्थित असलेले उपासक – उपासिका यांना साध्या सरळ सोप्या भाषेत ड. सोनावणे यांनी समजावून सांगितले.बुद्ध वचन, बुद्धांची शिकवण, ज्ञानप्राप्ती झाल्यावर त्यांनी संपूर्ण मानव जातीला दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग शोधून काढला.दुःखाचे मूळ कारण तृष्णा आहे..

.आणि तृष्णेला संपवण्यासाठी मोह, माया, द्वेष, राग, लोभ, अहंकार, वासना, ह्या सगळ्या गोष्टी जाळून टाकल्या पाहिजे तरच आपल्याला निब्बाण प्राप्त करता



येईल.बावीस प्रतिज्ञाचे काटेकोरपणे पालन केल्याने आपण बुद्ध धम्मावर आरूढ होऊ.इतर धर्मावर आपण टीका न करता, आपली संस्कृती आपण जपली पाहिजे, जतन केली पाहिज

े. लेणी संवर्धन केली पाहिजे, जसे वेळ मिळेल तिथे जाऊन लेणीचा अभ्यास केला पाहिजे.मानवाच्या सर्वांगीण कल्याणासाठी जो धर्म आहे, तो बुद्ध धम्मच आहे याची खात्री झाल्यानंतरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला बुद्ध धम्म देऊन आपल्या वरती खूप मोठी जबाबदारी दिलेली आहे.

ज्ञानयोगी बुद्ध विहार समितीचे पदाधिकारी आणि धम्मसेवक वैभवजी सोनावणे, ॲड. श्रीकांत कांबळे, कवी अनंत धनसरे विशेष उपस्थिती होती त्याचबरोबर बाळकृष्ण तांबे, धनराज शिराळ, मिलिंद जाधव, बाळू रणदिवे, संगिता गायकवाड, सिमा कसबे, प्राची तांबे, वैशाली कासारे, द्वारका चोकर, तर आदी उपस्थित होते.

## छोटे मोठे वाद बाजूला सारून दलित सवर्णांनी एकत्र आले पाहिजे : केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले

सांगोला/प्रतिनिधी : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानातील भारत घडविण्यासाठी आपसातील छोटेमोठे वाद बाजुला सारुन गावातील दलित सवर्णंनी एकत्र आले पाहिजे.दलित बहुजन मराठा सवर्णंनी एकजुटीने समतेने नांले पाहिजे.एकमएकांना सहकार्य केले पाहिजे.अशीच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा होती.आमदार डॉ.शहाजी बापू पाटील यांचे चिकमहुद गाव हे भेदभाव विसरुन समतेने नांदनारे गाव आहे.असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.

सांगोला तालुक्यातील चिकमहुद या गावात आमदार शहाजी बापू पाटील यांच्या पुढाकारातुन उभारण्यात आलेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२ फुट उंच पूर्णाकृती पुतळ्याचे



केंद्रिय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

विचार मंचावर आमदार शहाजी बापू पाटील,माजी आमदार दिपक आबा साळुंखे पाटील,रिपाइं चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे,रफिक भाई नदाफ,रिपाइं चे जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, जितेंद्र बनसोडे; खंडू सातपुते; वैभव गीते आदि अन्य मान्यंवर उपस्थित होते. चिकमहुद या गावात एक गाव एक पाणवठा तसेच सहभोजन परंपरा चालवत असून सर्व गाव सर्व जाती भेद विसरुन समतेने नादंत आहे.आमच्या गावाला सामाजिक समतेचा पिढीजात संस्कार लाभला आहे.असे मत आमदार शहाजी बापू पाटील यांनी या वेळी व्यक्त केले.

## खोदलेल्या विहिरी, भूपृष्ठावरील जल आणि उपसा सिंचन योजनांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर

नवी दिल्ली : देशात लघुसिंचन योजनांमध्ये राज्य दुसऱ्या क्रमांकावर जलशक्ती मंत्रालयाने लघु जलसिंचन योजनांचा सहावा गणना अहवाल केला प्रकाशित केंद्रीय जलसंपदा मंत्रालयाच्या जलसंपदा, नदी विकास आणि गंगा पुनरुत्थान विभागाने लघु जलसिंचन योजनांचा सहावा गणना अहवाल प्रकाशित केला असून, खोदलेल्या विहिरी, भूपृष्ठावरील जल आणि उपसा सिंचन योजनांमध्ये महाराष्ट्र अग्रेसर असल्याचे अहवालात नमूद आहे. तसेच देशात लघुसिंचन योजनांमध्ये राज्य दुसऱ्या क्रमांकावर असल्याचेही नमूद आहे. देशात उत्तर प्रदेशात सर्वाधिक लघु जलसिंचन योजना आहेत. त्यापाठोपाठ महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि तामिळनाडू ही राज्ये आहेत. भूजल योजनेतही उत्तर प्रदेश आघाडीवर आहे, त्यापाठोपाठ महाराष्ट्र, मध्य प्रदेश, तामिळनाडू आणि तेलंगण ही राज्ये आहेत. भूपृष्ठावरील जल योजनांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगण, ओदिशा आणि झारखंड या राज्यांचा सर्वाधिक वाटा आहे. जलसंपदा मंत्रालयाच्या जलसंपदा, नदी विकास आणि गंगा पुनरुत्थान विभागाने लघु जलसिंचन योजनांचा सहावा गणना अहवाल २६ ऑगस्ट रोजी प्रकाशित केला आहे. या अहवालानुसार देशामध्ये




२३.१४ दशलक्ष लघु जलसिंचन योजनांची नोंद झाली आहे, ज्यापैकी २१.९३ दशलक्ष (९४.८%) योजना भूजल आणि १.२१ दशलक्ष योजना(५.२%) भूपृष्ठावरील जल योजना आहेत.

लघु जल सिंचन योजनांमध्ये डगवेल्सचा सर्वाधिक वाटा आहे, त्याखालोखाल कमी खोलीवरील कूपनलिका, मध्यम खोलीवरील आणि जास्त खोलीवरील कूपनलिकांचा समावेश आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक डगवेल्स, भूपृष्ठावरील वाहणाऱ्या पाण्याच्या आणि उपसा सिंचनाच्या योजना आहेत. तर उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि पंजाब ही राज्ये अनुक्रमे कमी खोलीवरील कूपनलिका, मध्यम खोलीवरील आणि जास्त खोलीवरील कूपनलिकांमध्ये आघाडीवर आहेत. सर्व लघु सिंचन योजनांपैकी ९७.०% योजना वापरात आहेत, २.१% योजना तात्पुरत्या स्वरुपात वापरात नाहीत, तर ०.९% योजना कायमस्वरुपी बंद आहेत. कमी खोलीवरील आणि मध्यम खोलीवरील योजना वापरात असलेल्या योजनांमध्ये आघाडीवर आहेत. लघु सिंचन योजनांपैकी बहुसंख्य (९६.६%) योजना खाजगी मालकीच्या आहेत. भूजल योजनांपैकी खाजगी मालकीचा वाटा ९८.३% आहे तर भूपृष्ठावरील जल योजनांमध्ये खाजगी मालकीचा वाटा ६४.२% आहे.भूजल योजनांमध्ये डगवेल्स, कमी खोलीवरील कूपनलिका, मध्यम खोलीवरील आणि जास्त खोलीवरील कूपनलिकांचा समावेश आहे.

भूपृष्ठावरील योजनांमध्ये पृष्ठभागावरील वाहते पाणी आणि उपसा सिंचन योजनांचा समावेश आहे. ५ व्या सिंचन योजना गणनेच्या तुलनेत ६ व्या गणनेत लघु जलसिंचन योजनांमध्ये १.४२ दशलक्ष योजनांची वाढ झाली आहे. राष्ट्रीय पातळीवर भूजल आणि भूपृष्ठावरील अशा दोन्ही योजनांमध्ये अनुक्रमे ६.९% आणि १.२% वाढ झाली आहे.

## अक्कलकोट इंडियन मॉडेल स्कूल चे नेहरू हॉकी स्पर्धेत यश

अक्कलकोट/प्रतिनिधी : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा हॉकी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या १५




वर्षाखालील मुलांच्या गटात विश्व अकॅडमी अक्कलकोट या संघाचा ३–० ने पराभव करत अक्कलकोट येथील इंडियन मॉडेल स्कूल ने स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. विजयी संघ – जीशान मेलीनमनी (कर्णधार), शौर्य कापसे, प्रतीक स्थावरमठ, प्रितीश चव्हाण, आदित्य जंगले, शुभम जिडगे, सोहम निंबाळकर, आदित्य पाटील, शिवपुत्र करपे, प्रसाद दोडमणी, अथर्व दसले, लखन गुमटे, झकियान पटेल, कृष्णा हेगडे, कपिल हिंडोळे, आदित्य हिरतोट, आदित्य पवार. या संघाला क्रीडाशिक्षक सतीशकुमार परदेशी, क्रीडा सहशिक्षक दयानंद दणूरे, राज्य हॉकी मार्गदर्शक श्री जरार कुरेशी, हॉकी प्रशिक्षक आवेज होटगी यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे संस्थापक अध्यक्ष माजी गृहराज्यमंत्री श्री सिद्धाराम म्हेत्रे साहेब, संस्थेचे उपाध्यक्ष श्री अमोल जोशी सर, सौ सायली जोशी मॅडम, शीतलताई म्हेत्रे मॅडम, मुख्याध्यापिका सौ गौरी दातार मॅडम व प्राचार्य डॉ. गणपती वाघमोडे सर तसेच पालक शिक्षक व शिक्षकेतर वर्गाने अभिनंदन केले.

## राष्ट्रीय क्रीडा व प्रबुद्ध लोककला विद्यापीठ स्थापन करा
### अध्यापक भारती–कर्डक प्रतिष्ठाणची सरकारकडे पुन्हा मागणी

नाशिक/प्रतिनिधी : कला व क्रीडा–खेळ मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे.मानवाच्या जीवनात उत्तम आरोग्य, प्रभावी व्यक्तिमत्व हिच खरी संपत्ती, समृध्द जीवनाची गुरुकिल्ली होय.खेळाद्वारे व्यक्तिमत्त्व विकास,राष्ट्रीय अस्मिता वृद्धिंगत तर होतातच सोबतच सांघिक भावना उन्नत होतात. देशाच्या परिवर्तनशील लोकप्रबोधक कला– देशी–विदेशी खेळ तथा क्रीडा क्षेत्रातील उन्नतीसाठी राष्ट्रीय व राज्य कला–क्रीडा विद्यापीठ आणि जिल्हा– तालुकास्तरावर कला–क्रीडा विद्यालय स्थापन करण्यात यावी अशी भूमिका अध्यापकभारती व लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान नाशिक महाराष्ट्र सन २००० पासून विविध आंदोलन,सत्याग्रह,ठिय्या, सह्यांच्या मोहिमांद्वारे सरकारकडे सातत्याने मागणी करत असून केंद्र व राज्य सरकार गंभीर नसून केवळ घोषणा खेरीज ठोस कृती होत नसल्याने अध्यापकभारती व कर्डक प्रतिष्ठान आंदोलनात्मक भूमिका घेईन असे माहिती उभय संस्थांच्या वतीने संस्थापक शरद शेजवळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली असून केंद्र व महाराष्ट्र राज्य सरकारला निवेदन देऊन केली आहे.

भारता सारख्या खंडप्राय देशात कला–क्रीडा–शिक्षण विकासा संदर्भात कोणताही ठोस धोरणात्मक कार्यक्रम नाही.कला– क्रीडा–शिक्षण–प्रशिक्षणाबद्दल केवळ शासकीय घोषणाबाजी होते. प्रत्यक्षात मैदनात कोणतेही कृती नियोजन नसते व नाही म्हणून इतक्या मोठ्या लोकसंख्येच्या देशाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळ क्रमवारीत आणि नियोजन शुन्यतेमुळे यशस्वी कामगिरी आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाच्या स्पर्धेतही नगण्याच असते. शाळा, महाविद्यालय पातळीवर खेळाचे शिक्षण–प्रशिक्षण,विविध कला–क्रीडा स्पर्धा यांस योग्य मार्गदर्शन व भरघोस आर्थिक तरतुद करुन नवोदय विद्यालय व राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय कला– क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यात येणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीय कला–क्रीडा विद्यापीठ स्थापना अभियानच्या मुख्य मागण्या : प्रमुख मागण्या**

राष्ट्रीय व राज्य कला–क्रीडा विद्यापीठ स्थापना केंद्र राज्याने करावी, नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर तालुका, जिल्हा स्तरावर निवासी कला–क्रीडा विद्यालय, महाविद्यालय स्थापन करावीत.

१) अनुदानित–विनाअनुदानित शाळा–महाविद्यालयात विद्यार्थी संख्ये प्रमाणे कला– क्रीडा व कार्यानुभव,संगणक शिक्षक न नियुक्त करावेत. २) महाराष्ट्र शासनाने २००२ मध्ये घोषीत केलेले क्रीडा धोरण त्वरीत अंमलात आणावे. ३) जिल्हा स्तरावरील कला–क्रीडा प्रबोधिनीची– प्रवेश क्षमता यात वाढ करावी. ४) शाळा–महाविद्यालय विद्यापीठ स्तरावरील विविध स्पर्धा– प्रशिक्षण या करीता जास्तीत जास्त अर्थिक तरतुद करण्यात यावी. ५) महाराष्ट्र शासनाने यापुर्वी घोषीत केलेल्या मिनिऑल्मपिक स्पर्धा दर २ वर्षा आड त्वरीत सुरु कराव्यात. ६) तालुका स्तरावरील क्रीडा संकुले–खेळाची मैदाने यांच्या कामाला गती द्यावी व ते लवकरात लवकर पूर्ण करुन लोकार्पित करावेत. ७) शाळा– महाविद्यालय स्तरावरील स्पर्धेत चमकदार कामगिरी करणार्या गरिब, ग्रामीण, कष्टकरी विद्यार्थी मुला–मुलींना केंद्र व राज्य सरकारने दत्तक घेवुन त्यांच्या कला–क्रीडा,कार्यानुभव, संगणक शिक्षण प्रशिक्षणाची जबाबदारी घ्यावी. ८) खेळाडुंच्या शासकीय नोकरी नियुक्तीत पारदर्शकता आणावी व त्यांना सन्मानाने वागवावे.९) कला–क्रीडा,संगणक व कार्यानुभव हे विषय शाळा महाविद्यालयात अनिवार्य विषय म्हणून शिकविले जावेत. १०) स्वतंत्र कला–क्रीडा,कार्यानुभव,कार्यानुव विद्यालयांची स्थापना करण्यात यावी.अशा प्रमुख मागण्या संदर्भात केंद्र व राज्य सरकार कडे कलावंत,साहित्यिक क्रीडापटू, कला–क्रीडा मंडळे, संस्था,संघटना यांनी सदर राष्ट्रीय कला व क्रीडा विद्यापीठ स्थापना कार्यात सहभाग घेत आहेत.कला–क्रीडा व कार्यानुभव विषयाच्या व्यापकता करता स्वतंत्र विद्यापीठ/विद्यालय स्थापना होणे आवश्यक असून हा विषय शाळा महाविद्यालयातुन अनिवार्य करण्यात यावेत ह्या भूमिकेबद्दल अध्यापकभारती, लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान,नाशिक यांच्या भूमिकेस जनतेने पाठिंबा देऊन जनरेटा वाढवावा,कृतीशील सहभाग नोंदवावा असे आवाहन शरद शेजवळ यांनी केले आहे. प्रबुद्ध लोककला विद्यापीठ भारतीय संविधानास अभिप्रेत समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता ह्या जीवन मुल्यांवर आधारीत सांस्कृतिक समाज रचना स्थापित करणे व समस्त मानवाचे लोकरंजनातून लोकप्रबोधन कला–साहित्य संस्कृतिचा ठेवा चिरंतन तेवत ठेवण्यासाठी राष्ट्रीय एकात्मता कलाविष्कार जतन करत त्या कलांचे शिक्षण प्रशिक्षण देण्यात यावे. नव्या पिढीला आपल्या कला–क्रीडा जीवनाची महती कळावी,आपल्या साहित्य कला क्रीडा जीवनावर अभ्यास चिंतन शोध व्हावेत,कला–क्रीडा प्रकारांचे शिक्षण प्रशिक्षण पदवी–पदव्युत्तर शिक्षण स्वतंत्र कला/क्रीडा विद्यापीठातून दिले जावे अशी अपेक्षा आहे. भारत देशाच्या कला–क्रीडा तथा सांस्कृतिक इतिहासाची ओळख अभ्यास होणे व त्याचा संवर्धन–प्रचार प्रसार शिक्षण–प्रशिक्षण या करता विद्यापीठ/विद्यालया खेरीज दुसरा मार्ग असू शकत नाही.प्रचलित विद्यापीठातून एखादा छोटा विभाग कला क्रीडा शिक्षण अभ्यासाकरिता सुरू करून भारतीय कला व क्रीडा प्रकारांचा अवमान न करता कला–क्रीडा विद्यापीठ लवकरच अस्तित्वात येवोत अशी आग्रही भूमिका शरद शेजवळ यांनी पत्रकात मांडली आहे.